
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास

**कांबळे डी.एस.**
सहाय्यक प्राध्यापक , भूगोल विभाग ,
जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर (महाराष्ट्र ).

**प्रस्तावना : -**





मानवी साधन संपत्ती हा राष्ट्राच्या संपत्तीचा महत्वाचा आधार आहे. मात्र हा आधार मानवाच्या शिक्षण व बुध्दिमत्तेवर अवलंबून असतो. शिक्षण हा देशााच्या जलद विकासाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शिक्षण हे केवळ विचाराचे फळ नाही तर परिवर्तनाचेही साधन आहे. इ ाान हे साक्षरता व औपचारिक शिक्षण पध्दतीशी संबंधित आहे. साक्षरतेच्या पातळीचा लोकसंख्येच्या जननक्षमता, मर्त्यता, गतीमानता आर्थिक व्यवसाय व विकासावर परिणाम होतो. निरीक्षरता हा मानवी विकासाला मिळालेला शाप असून जागतिक पातळीवर साक्षरतेची तुलना करणे कठीण स्वरूपाचे आहे. 1951 च्या जनगणनेनुसार अशा व्यक्तिला साक्षर म्हणून ओळखले जात होते की, ज्याचे वय 4 वर्षापेक्षा जास्त असून त्याला कमीत कमी साधरण पत्र वाचता आले पाहिजे. भारतात जो मनुष्य समजून साधा संदेश कोणत्याही भाषेत लिहू व वाचू शकतो त्यास साक्षर मनुष्य असे म्हणतात.

स्त्री व पुरूष यांच्या मध्ये साक्षरतेचे प्रमाण व शिक्षणाची पातळी भिन्न भिन्न स्वरूपाची आहे. ग्रामीण व नागरी भागात असणारी लोकसंख्या भिन्न स्वरूपाची असल्याने त्याचा परिणाम साक्षरतेवर होतो. एखाद्या समाजात अथवा गावात, प्रदेशाात राहणा-या लोकसंख्येमध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्यास त्याठिकाणी जन्मदराचे प्रमाण कमी प्रमाणात आढळते तर ज्या प्रदेशाात साक्षरतेचे प्रमाण कमी त्याठिकाणी जन्मदर अधिक आढळून येतो. याशिवाय साक्षरतेमुळे अंधश्रध्दा, अंधविश्वास व गरीबी दूर होण्यास मदत होते. साक्षरतेमुळे राष्ट्रीयत्वाची व विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागते.

**अभ्यास क्षेत्र व अभ्यास विषय : -**

मराठवाडयातील 8 जिल्ह्यापैकी उस्मानाबाद हा एक महत्वाचा जिल्हा असून त्याचा अक्षवृत्तीय विस्तार $17^0 35'$ उत्तर ते $18^0$ 40′ उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे. तर रेखावृत्तीय विस्तार $75^0 16'$ पूर्व ते $76^0 40'$ पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे.उस्मानाबाद जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7512.4 चौ.कि.मी.आहे.महाराष्ट्रात क्षेत्रफळाच्या दृष्टिने उस्मानाबाद जिल्ह्याचा 24 वा क्रमांक लागतो.उस्मानाबाद जिल्ह्याचा पूर्व-पश्चिम विस्तार 280 कि.मी.असून दक्षिणोत्तर विस्तार सुमारे 240 कि.मी.आहे.

## उस्मानाबाद जिल्ह्याचे स्थान व विस्तार




नकाशा क्रं.1.1

उस्मानाबाद जिल्ह्याच्या उत्तरेस बीड,अग्नेयेस लातूर तर दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बिदर व कलबुर्गी हे दोन जिल्हे आहेत.वायव्येस अहमदनगर व नैऋत्येस सोलापूर जिल्हा आहे. प्रशासकीय कार्यासाठी जिल्ह्याचे उस्मानाबाद व भूम असे दोन महसूल विभाग करण्यात आले.

### उदेश :

1) उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचा अभ्यास करणे
2) मानवी जीवनात साक्षरतेचे महत्व जाणून घेणे
3) उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेवर परिणाम करणा-या घटकांचा अभ्यास करणे
4) उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय साक्षरतेचा अभ्यास करणे
5) साक्षरतेचे बदलते स्वरूप याविषयी माहिती अभ्यासणे

### माहिती स्त्रोत व संशोधन पध्दतीः

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, जर्नल, मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटचा उपयोग करण्यात आलेला आहे.

### साक्षरतेचे महत्व :

मानवी जीवनात शिक्षण ही एक मूलभूत गरज आहे. कमी साक्षरता हा विकासातील महत्वाचा अडसर आहे. शिक्षण हा जलद विकासाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शिक्षण हे विचाराचे फळ नसून परितर्वनाचे साधन आहे. शिक्षणामुळे मानवाचा सर्वांगीण विकास होतो.

**साक्षरता :-** एखाद्याने स्वतःच्या मातृभाषेत लिहणे व वाचण्याचे सामर्थ्य ( ability ) म्हणजे साक्षरता होय. आंतरराष्ट्रीय रूढीनुसार साक्षर म्हणजे माणसाची कोणत्याही भाषेतील किमान संदेश वाचण्याची व लिहण्याची क्षमता होय.

चेस्टर बोल्सच्या मते, नैसर्गिक शक्तीचे निमंत्रण आणि नीतीला योग्य आकार देणे व एक व्यवस्थित न्यायपूर्ण समाजाची निर्मिती करण्यासाठी शिक्षण हे सर्वात जास्त शक्तीशाली असल्याने` शिक्षणाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ होणे आवश्यक आहे.

1) साक्षरता एखाद्या देशाची सामाजिक आणि आर्थिक पातळी दर्शवीत असते.
2) साक्षरतेमुळे एखाद्या समाजाच्या आधुनिकीकरणाबद्दल माहिती प्राप्त होत असते.

3) साक्षरतेमुळे विवाहाचे वय, जन्म दर व मृत्यूदरावर परिणाम होत असतो.
4) साक्षरतेनुसार स्थलांतर होत असते.
5) स्त्रियांच्या साक्षरतेचा परिणाम बाल मृत्यू दरावर होत असतो.
6) साक्षरतेमुळे अंधविश्वास व गरीबी दूर होण्यास मदत होते.
7) साक्षरतेमुळे विश्व बंधुत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत होते.
8) लोकशाही शासन प्रणाली टिकवण्यासाठी साक्षरता आवश्यक आहे.
9) साक्षरतेच्या आधारावरच नियोजन आणि शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात येते.
10) साक्षरतेच्या अभावामुळे देशातील लोकात मानसिक वेगळेपण वाढीस लागते. आर्थिक दृष्टीने देश गरीब होत असतो.
11) साक्षरतेच्या अभवामुळे परंपरावादी, भाग्यवादी व निराशावादी विचारांची वाढ होत असते.
12) शिक्षण हा एकमेव महत्वाचा घटक आहे की ज्यामुळे, आर्थिक, सामाजिक, राजकीय व शास्त्रीय विकास शक्य होतो.
13 ) जे.आर. रेले आणि तारा कानेटकर यांनी केलेल्या सर्वेक्षणनुसार ज्या महिला पदवी किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतल्या आहेत. त्यांचे विवाहाचे वय निरक्षर महिलांच्या तुलनेत जास्त आढळून आलेले आहे. तसेच उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीयांमध्ये जन्म दर कमी आढळून आलेला आहे. अशा स्त्रिया कुटूंब नियोजनासारख्या कार्यक्रमाला जास्त प्रतिसाद देतात. तसेच माध्यमिक किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतलेल्या मातांमध्ये बाल मृत्यूदर कमी आढळून आला.

**साक्षरतेवर परिणाम करणारे घटक : -**

जगातील विविध देशांच्या साक्षरतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, साक्षरतेचे प्रमाण सर्वत्र सारख्या स्वरूपाचे नाही. त्यामुळे साक्षरतेवर परिणाम करणा-या घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**1) आर्थिक घटक : -** आर्थिक स्थिती व साक्षरता यामध्ये जवळचा संबंध आहे. औद्योगिक व कृषिप्रधान देशाच्या साक्षरतेवरून हे स्पष्ट होते की उद्योग प्रधान देशात शिक्षणास जास्त महत्व आहे.

तर कृषि प्रधान देशात शिक्षणास फार से महत्व नाही. त्यामुळे दोन्ही देशात साक्षरतेत खपू फरक आढळून येतो.

आर्थिक स्थितीचा विचार करता आर्थिक स्थिती उत्तम असणा-या सभ्य समाजात गरीबी, आदिवासी समाजापेक्षा साक्षरता जास्त असते. पालकांचे राहणीमान व उत्पन्न यावर साक्षरता अवलंबून असते.म्हणून श्रीमंत कुटूंबात साक्षरता जास्त तर गरीब कुटूंबात साक्षरता फारच कमी आढळते.

**2) वाहतुक व दळणवळणाच्या सोई : -** जेथे वाहतूक व दहणवळणाच्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत . तेथे साक्षरतेचे प्रमाण जास्त असते. ग्रामीण व शहरी भागात व्यवस्थित व योग्य वाहतूक सोयी नसतात. तेव्हा ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरात जाऊन शिकू शकत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

**3) नागरीकरण :** मोठया प्रमाणात नागरीकरण झालेल्या प्रदेशात साक्षरता जास्त असते. नागरी भागात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध असतात तेथे शिक्षणाची गरज जास्त असते.

**4) तांत्रिक ज्ञानाची प्रगती :** नागरी क्षेत्रात तांत्रिक ज्ञानाची प्रगती झालेली असते. येथे नव-नवीन उद्योग स्थापन होतात. उद्योगात नवनवीन तंत्राचा वापर केला जातो. त्यामुळे शहरी भागात शिक्षणाला अधिक महत्व आहे. त्यामुळे शहरी भागात साक्षरता जास्त व ग्रामीण भागात तांत्रिक ज्ञानाची प्रगती न झाल्याने साक्षरतेचे प्रमाण कमी असते.

**5 ) स्त्रियांचा सामाजिक दर्जा :** ज्या समाजात स्त्रियांचे स्थान पुरूषाच्या बरोबरीने असते तेथे स्त्री शिक्षणावर विशेष जोर दिला जातो. अशा प्रकारे समाजातील अर्धा हिस्सा शिक्षीत झाल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढते. यामुळे ख्रिश्चन समाजात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. याउलट ज्या समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. अशा

समाजात स्त्रियांना शिक्षीत करण्याकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे अशा समाजात साक्षरतचे प्रमाण कमी असते. मुस्लीम धर्मात स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम असल्यामुळे त्या समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

**6) शिक्षणाच्या सुविधा :-** शहरात अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था उपलब्ध असलयामुळे शिक्षण घेण्यासाठी फारशी अडचण येत नाही. या उलट ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा कमी असतात. शिक्षण संस्था कमी असून दूरदूर अंतरावर असतात. त्यामुळे कितीतरी मुले शिक्षणापासून वंचित राहतात. व याचा परिणाम साक्षरतेवर होत असतो त्यामुळे भारत सरकारने प्रत्येक गावात प्राथमिक शिक्षणाच्या सोयी सुविधा पुरविण्याचे ठरविले आहे. ग्रामीण भागातील मुले पैशा अभावी दूर शहरात शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकत नाहीत.

**7) जाती संरचना : -** ज्या समाजात जातीय संरचनेमध्ये विविधता आढळून येते. तेथे वेगवेगळया वर्गात शैक्षणिक संस्था काढण्याची निरोगी स्पर्धा लागलेली असते. कारण त्या जातीशी संबंधीत असलेल्या लोकात शिक्षणाचा प्रसार होवू शकतो. यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढते.

**8) राहणीमानाचा दर्जा :** ज्या कुटूंबात राहणीमानाचा दर्जा उच्च असतो त्या कुटूंबात मुलांचे शिक्षण आवश्यक मानले जाते किंवा त्याच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जाते. त्यामुळे अशा कुटूंबात साक्षरता जास्त आढळते . याशिवाय ज्या कुटूंबाचा राहणीमानाचा दर्जा नित्कृष्ट आहे तेथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

**9) शासकीय धोरण :** साक्षरतेचा दर उंचावण्यामध्ये शासकीय धोरण महत्वाची भूमिका बजावत असते. सक्तीचे शिक्षण, निशुल्क शिक्षण, सार्वत्रीक शिक्षण, प्रौढ शिक्षण अशा प्रकारच्या सरकारी धोरणामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढत असते. भारत सरकार देखील बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत आणि अनिवार्य करून साक्षरतेचा दर उंचावण्याचा प्रयत्न करत आहे. अशा प्रकारे 15 ते 35 वर्षे वय असणा-या लोकांसाठी प्रौढ शिक्षणाचे धोरण अवलंबून प्रौढांना देखील साक्षर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.त्यामुळे भविष्यात साक्षरता दर वाढत आहे.


## विषय विवेचन -

इ.स.न.2011 च्या जनगणनेनुसार तक्ता क्र.1.1 मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय एकूण साक्षरता दाखविण्यात आलेली आहे. त्यात उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद तालुक्यात साक्षरतेचे प्रमाणे सर्वात जास्त आढळते. तर सर्वात कमी साक्षरता परंडा तालुक्यात आढळून येते.

**तक्ता क्र.1.1 उस्मानाबाद जिल्हा तालुका निहाय एकूण साक्षरता ( 2011 )**

| अ.क्र. | तालुका | एकूण साक्षरता |
|---|---|---|
| 1. | उस्मानाबाद | 88.89 |
| 2 | तुळजापूर | 77.46 |
| 3 | कळंब | 80.56 |
| 4 | भूम | 76.11 |
| 5 | परांडा | 75.33 |
| 6 | वाशी | 78.14 |
| 7 | उमरगा | 77.75 |
| 8 | लोहारा | 76.68 |

स्त्रोत : उस्मानाबाद जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन 2014.




उस्मानाबाद तालुक्यात सर्वाधिक साक्षरता 2011 मध्ये 88.89 % आढळून येते तर सर्वात कमी साक्षरता परांडा तालुक्यात 75.33 % एवढी आढळते. त्यामुळे शैक्षणिक विकास उस्मानाबाद तालुक्यात मोठया प्रमाणात झालेला असल्याने तेथे साक्षरतेचे प्रमाण अधिक आढळून येते.

**निष्कर्षः -**

1) लोकसंख्या भूगोलात साक्षरता हा घटक महत्वाचा असून उस्मानाबाद जिल्ह्याचा विकासाचा कणा म्हणून ओळखला जातो.

2) उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद तालुका हा साक्षरतेच्या बाबतीत महत्वाचा असून या तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण जास्त आढळते.

3) परांडा तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

4) नागरी भागात साक्षरता अधिक तर ग्रामीण भागात साक्षरता कमी आढळून येते.

**उपाययोजना :-**

1) उस्मानाबाद हा मराठावाड्यातील एक जिल्हा असून जिल्हा प्रशासनाने शाळेच्या वेळामध्ये व वाहतुकीची साधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे अधिक अधिक मुले व मुली शिक्षण घेतील त्यामुळे नक्कीच साक्षरतेचे प्रमाण वाढेल.

2) उस्मानाबाद जिल्ह्यात ग्रामीण भागात ज्या लोकवस्ती जवळ शाळा नाहीत तेथे शाळा सुरू करून देण्यात यावे- जेणे करून शिक्षणाचा लाभ सर्व थरातील लोकांना होऊ शकेल .

3) शासनाने शिक्षणासाठी विशेष सुविध उपलब्ध करून देण्यात यावे .

4) प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण सर्वांसाठी मोफत देण्यात यावे.

5) ग्रामीण भागातील पालकांचे उत्पन्न कमी असते त्यामुळे शासनाने बसचा पास उच्चशिक्षणापर्यत मोफत देण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ -**

1) लोकसंख्या भूगोल - के.ए.खतीब विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद
2) लोकसंख्या भूगोल डॉ.विठ्ठल घारपूरे पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर
3) लोकसंख्या भूगोल डॉ.शेटे, डॉ.फुले, डॉ.शहापूरकर- अभिजीत पब्लिकेशन , लातूर
4) जनसंख्या भूगोंल - दुबे आणि सिंग

5) उस्मानाबाद जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन 2012.
6) वर्तमान पत्र
7) गुगल .कॉम